"तू आमच्या गांवीं आलास तर मी तुझ्याबरोबर लग्न करून तुझी पत्नी म्हणून रहायला तयार आहे. तूं तिकडे यायला तयार असशील तर वाटदेखील तुला कळेल.' असें सांगून ती त्याच्याकडे प्रेमानें पहात आकाशांत उडूं लागली.

पुष्करावती नगरीस जावें लागलें तरी चालेल पण अनुरागपराचा विसर होणें अशक्य! यत्न करून पहावा. यश मिळालें तर ठीकच पण यत्न केल्याशिवाय स्वस्थ बसून राहाणें याला आवडेना तो उत्तरकडे निघाला.

वाटेंत त्याला तीन वैश्य तरुण भेटले. ते देखील उत्तरेकडेच जात होते. म्हणून तिघे बरोबरच निघाले.

कांहीं अंतर चालून गेल्यावर ते ताजिक जातीच्या देशांत येऊन पोंचले. ताजिक जातीच्या लोकांनीं या चौघांना धरलें आणि एका श्रीमन्त ताजिक व्यापाऱ्याच्या हातीं त्यांना विकून टाकलें. त्या व्यापाऱ्यानें त्यांना आपल्या राजाकडे नजराणा म्हणून पाठवून दिलें. ते ताजिक देशाच्या राजधानीजवळ पोंचले असतील त्याच वेळीं, दैवयोगा असा कीं राजा मरण पावला. म्हणून ताजिक व्यापाऱ्याच्या नोकरांनीं राजाच्या मुलाजवळ विनंती केली कीं त्यांच्या धन्यानें राजाकडे नजराणा म्हणून त्या चौघांना पाठविलें होतें. तर युवराजानें तो नजराणा स्वीकारावा. असें सांगून त्यांनीं निश्चयदत्त व तिघां वैश्य तरुणांना युवराजाकडे सोंपलें व ते निघून गेले.

"असें होय! तर मग माझ्या वडिलांची समाधी बांधतांना त्यांच्या प्रेतावरावर या चौघांना पण पुरावें. तोपर्यंत यांना तुरुंगांत



ठेवावें." असी युवराजानें आपल्या नोकरांना आज्ञा केली.

राजाच्या शिपायांनीं चौघांना एका झोंपडींत नेऊन ठेवलें. आपल्याबरोबरचे तिघे तरुण घाबरून गेलेले पाहून निश्चयदत्त त्यांना म्हणाला—"घाबरून जाऊन धरधर कांपत राहाल्यानें तुमच्यावरचें संकट टळेल असें वाटतें का तुम्हांला. मरायचेंच आहे तर हंसत खेळत मरण्याची तयारी कां ठेवीत नाहीं? नाहींतर सर्वांचें रक्षण करणाऱ्या दुर्गामातेचें तरी स्मरण करा" असें सांगून त्यानें महादेवाचें स्मरण केलें

व मनातल्या मनांत त्याला नमस्कार करून निश्चिंतपणें झोपला.

त्याला स्वप्नांत झाला. देवीनें स्वप्नांत येऊन त्याला सांगितलें, तूं बंधनमुक्त झाला आहेस. तूं तुला वाटेल तिकडे निघून जा. डोळ्यांची झोप मोडली व पाहतात तर बोधांचीं बंधनें तुटलीं. त्यांना फार आनंद झाला.

रात्र अजून बरीच उरली होती. दोघे उठले आणि झोपडीतून बाहेर निघाले आणि उजाडण्यापूर्वी बरेच दूर जाऊन [illegible]



[illegible] पण [illegible] म्हणाला "[illegible] [illegible] मनांतून [illegible] [illegible] म्हणून आम्ही [illegible] [illegible]

[illegible] पराक्रम गेटामध्यें होतें म्हणून तो [illegible] चालत राहाला.

[illegible] [illegible] रानांत येऊन पोंचले.

त्या वेळीं त्यांना कांहीं लाकूडतोडे रानांतून लाकडें फोडून परत येत असलेले दिसले. त्यांनीं त्यांना विचारलें [illegible] निवाऱ्यात इकडे [illegible] पडला [illegible] आसपास कोठें गांव नाहीं. [illegible] एक जुनें शंकराचें देऊळ आहे. [illegible] त्यांत राहणें हिताचें नाहीं [illegible] श्रृंगोत्पादिनी नांवाची एक यक्षिणी राहाते [illegible] [illegible]

[illegible] शिंगें येतात. ती त्यांना जनावरं करून [illegible] व त्यांना खाते.

परंतु त्या शाक्त लोकांनीं त्या लाकूडतोड्यांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केलें. ते [illegible] म्हणाले "आम्ही नेहमीं स्मशानांत राहतों. आम्ही पाहिल्या आहेत पुष्कळ यक्षिणी! आम्ही हिला पाहून भिऊन [illegible] का वाटतें तुम्हाला?" असें [illegible] ते शंकराच्या देवळाकडे निघाले. [illegible] पण त्यांच्याबरोबर [illegible] [illegible] पण त्यांच्याबरोबर देवळांत [illegible]

शंकराच्या देवळांत शाक्तांनीं रात्रीं एक मंडळ केलें व आंत जाऊन बसले. मैदून ते कोणता तरी मंत्र जपूं लागले.

मध्यरात्रीच्या सुमारास श्रृंगोत्पादिनी तेथें आली. ती मंडळाच्या बाहेर उभी राहिली. ती नृत्य करूं लागली व एका शाक्त माणसाकडे पाहून आपला मंत्र म्हटला. त्या बरोबर त्याच्या डोक्यावर एक शिंग उगवलें.

तो शाक्त उठून उभा राहिला व नाचत नाचत जाऊन त्यानें अग्नींत उडी टाकली. यक्षिणीनें त्याला आगींतून काढून खाऊन [illegible]

अशा तऱ्हेनें यक्षिणीनें एका मागून एक तिघां शाक्तांना त्यांच्या डोक्यावर शिंगें उगवून खाऊन टाकलें. ते गाढ नाचत आगींत जाऊन पडत. चांगलें भाजून निघाल्यावर तिनें त्यांना खाल्लें. तिनें तिघांना खाल्लें असल्यानें तिला मद चढला असावा. त्याच धुंदींत तिनें कंकाल किन्नरी काढून ठेवली व बेशुद्ध स्थितींत जमिनीवर आडवी पडून राहाली.

निश्चयदत्त तें पाहून क्षणार्धांत उडी मारून तिच्याजवळ गेला. कंकाल किन्नरी उचलून घेतली. तिनें म्हटलेला शिंग उगवणारा मंत्र त्यानें चारदां ऐकला होता. म्हणून तो त्याला तोंडपाठ झाला होता. यक्षिणीकडे पाहून त्यानें तो मंत्र म्हटला. यक्षिणीच्या डोक्यावर शिंगें उगवली. ती शुद्धीवर येऊन निश्चयदत्ताच्या पायां पडली व म्हणाली–

"मी बाई माणूस. माझ्यावर दया कर. मंत्र म्हणूं नकोस. तूं म्हणशील तें करायला मी तयार आहे. तुला हवें असेल तर तुला अनुरागपराकडे पोंचतीपण करीन."

यक्षिणीच्या विनवण्या ऐकून त्यानें मंत्र मागें घेतला. वचन दिल्याप्रमाणें ती त्याला आपल्या पाठीवर बसवून घेऊन आकाशांत उडूं लागली व उजाडण्यापूर्वी पुष्करावतीला येऊन पोंचली.

अनुरागपराला दिव्य दृष्टीनें तिचा प्रियकर येत असल्याचें कळलें होतें. ती त्याच्या स्वागतासाठीं आपल्या वडिलांच्या घरांत निघाली. तिला भेटून निश्चयदत्ताला फार आनंद झाला. नंतर निश्चयदत्त व अनुरागपरा यांचा विवाह पुष्करावती नगरींत थाटामाटानें विद्याधर देशाच्या रीतीप्रमाणें पार पडला.



माकडचेष्टा

एका गांवी एक म्हातारा रहात असे. एकदा तो शिदोरी बांधून घेऊन डोंगरावर गवत कापण्यासाठी निघून गेला. त्यानें शिदोरी एका झाडाच्या फांदीला बांधून ठेवली होती.

तो गवत कापून थोडा वेळ दम घ्यायला झाडाखालीं येऊन बसला. तेवढ्यांत कोठून तरी माकडांची एक टोळी आली आणि फांदीला बांधून ठेवलेली शिदोरीची पुरचुंडी काढून घेऊन त्यांनी फस्त करून टाकली.

हें सर्व डोळ्यांनी पहात असून म्हातारा कांहीं बोलला नाहीं. निःशब्दपणें पहात बसून राहिला. माकडांनी त्याला पाहिलें, पण अचल दगडाची मूर्ति असें समजून निश्चिंतपणें त्याची शिदोरी खाऊन टाकली. पण आश्चर्य म्हणजे, तीं कोठून तरी पैसे घेऊन आलीं व म्हाताऱ्यासमोर ते टाकून निघून गेलीं. तोंपर्यंत म्हातारा जागचा हलल्याशिवाय बसून राहिला.

जवळच्या एका पारावरच्या मूर्तीसमोर येणारे जाणारे लोक पैसे टाकीत. ते माकडांनी पाहिलें होतें. ते पैसे गोळा करून त्यांनी ठेवले होते आणि ते पैसे त्यांनी म्हाताऱ्याला दिले.

माकडें निघून गेल्यावर म्हातारा हंसला. आणि ते पैसे घेऊन घरीं गेला. त्याला ती सर्व ईश्वरी कृपाच वाटली.

वाटेंत त्यानें स्वतःसाठीं व बायकोसाठीं नवीन कपडे विकत घेतले. घरीं गेल्यावर बायकोला सर्व पैसे नेऊन दिले. भाग्य उदयास आलें असें त्यांना वाटलें. त्या दिवशी म्हातारीनें पंच पक्वान्नांचें जेवण तयार केलें.

श्री मो. स. सुतार

दोघे जेवायला बसले. त्याच वेळी म्हातारी शेजारीण आली. तिनें त्यांना विचारलें "अहो, आज तुमच्याकडे दिवाळी उजाडली की काय? काय छान छान कपडे वाहेत आणि, पंच पक्वान्नांचे जेवण! आहे तरी काय?"

म्हातारीनें शेजारणीला जेवायला वाढलें आणि माकडांच्या कृपेनें भाग्य कसें उदयास आलें तें सांगितलें.

शेजारीण घरीं गेली. तिनें आपल्या नवऱ्याला माकडांची गोष्ट सांगितली आणि म्हणाली "तुम्ही का नाहीं जाऊन माकडांनी दिलेले पैसे आणीत?" शेजारी, बायकोच्या सांगण्याप्रमाणें भाग्याची परीक्षा पाहायला तयार झाला.

दुसऱ्या दिवशीं म्हाताऱ्या शेजारणीनें नवऱ्याला शिदोरी बांधून दिली. तो ती [illegible]

[illegible] आणि [illegible] [illegible]

[illegible] म्हातारा [illegible] सुद्धा [illegible] लागला [illegible]

[illegible] तेव्हां तो मूर्त [illegible] नसल्याचें माकडांना कळलें. [illegible] बोचकारलें व ओरबाडलें. [illegible] अंग रक्तबंबाळ झालें.

म्हातारी [illegible] तेव्हां त्याची बायको आपल्या [illegible] नवऱ्याची [illegible] करून [illegible] वाट पहात बसली होती.

शंखध्वनी

[illegible]

[illegible] किल्ल्याच्या [illegible] शंकराचें देऊळ [illegible] शिवलिंगासमोर [illegible] शंख [illegible] प्रमाण [illegible] वाजवला [illegible] आणि [illegible]

[illegible] कृपाणसिंह [illegible] सैन्य मोहिमेच्या तयारीनें [illegible] दोघां भावांचे [illegible]

वर्णसिंह आपल्या भावाला बरोबर घेऊन घोड्यावर चढून गेला. शंकराच्या देवळांत देवाला नमस्कार करून शिवलिंगासमोर जो शंख ठेवलेला होता तो घेऊन त्यानें वाजविला. एक विचित्र आवाज सगळ्या राज्यभर ऐकूं आला. आनंदानें व वीररसानें सर्वांची हृदयें उचंबळून आलीं.

वर्णसिंहानें शंख यथा स्थानी ठेवून दिला. नंतर तो आपला भाऊ कृपाणसिंह याला म्हणाला "कृपाण! कदाचित मी या युद्धांत ठार झालों तर तू येथें देवळांत येऊन हा शंख वाजव आणि राज्याचा अधिपती [illegible]

कृपाणसिंह [illegible] शिपाई [illegible] [illegible]





सरोवरांचे नैसर्गिक सौंदर्याने भारावलेला एक अतिसुंदर देश होता. आपल्या देशा-हून सुंदर देश या जगांत कोठें असणार असें त्याला वाटलें.

दोघे भाऊ घुमटावरून खालीं उतरले व घोड्यावर बसून आपलें सैन्य घेऊन उदय-पुराच्या दिशेनें कूच करीत निघाले.

त्या वेळीं कृपाणसिंहाच्या मनांत मुसल-मानांशीं होणाऱ्या युद्धांत जय मिळणार कीं पराभव याचा विचार मुळींच नव्हता. आपण स्वतःच या देशाचे अधिपती झालों तर किती बरें होईल! परंतु मोठा भाऊ जिवंत असेपर्यंत तें अशक्य ही गोष्ट त्याच्या मनाला बोचत होती.

रणसिंह एक साहसी व पराक्रमी योद्धा होता. तो रणांगणावरून पाठ फिरवून परत येणें शक्य नाहीं. मुसलमानाचें सैन्य मोठें असल तर नक्कीच युद्धात रजपूतांचा पराभव होणार व भाऊ त्यांत ठार होणार. परंतु भाऊ रणांगणावर मेला नाहीं तर! तें नक्की व्हायला पाहिजे. कृपाणसिंह स्वतः मुसल-मानांशी युद्धाला मुळींच तयार नव्हता. भावानें बोलाविलें म्हणून तयार झाला. युद्धांत भाऊ मरण पावला कीं आपणाला गादी मिळेल ही आशा मनांत बाळगून तो युद्धभूमीवर आला होता. भाऊ रणांगणांत मेला नाहीं तर स्वतःच त्याचा वध करावा असदेखील त्यानें मनाशी ठरविलें. परंतु तो तसा मेला तर लोक त्याच्यावर संशय करतील. म्हणून त्यानें मारेकरी नेमून भावाचा खून करण्याचें ठरविलें. पैशाच्या लोभानें कोणी तरी हें कृत्य करायला तयार होईल असें त्याला मुळींच शंका नव्हती.

त्याला तसे तीन सैनिक स्वतःच्याच सैन्यांत सापडले. त्यानें त्यांना पैसे चारून आपल्या मोठ्या भावाचा खून करायला आणि त्याचें प्रेत कोठें तरी गुप्तपणे टाकायला सांगितलें.

पुढें कांहीं दिवसांनीं रजपुतांचें सैन्य यमुनेकांठीं छावणी टाकून रहात असतां कृपाणसिंहानें नेमलेल्या मारेकऱ्यांनीं काम पुरें झाल्याचें येऊन त्याला सांगितलें. म्हणाले: "महाराज आपल्या तंबूंत झोपले असतां त्यांना ठार करून त्यांचें प्रेत यमुनेंत टाकलें आहे." कृपाणसिंहानें त्यांना इनाम देऊन निरोप दिला.

दुसऱ्या दिवशीं रणसिंह एकाएकीं नाहींसा झाल्याचें वर्तमान छावणीभर पसरलें. 'तो तंबूंत नाहीं व त्या बिछान्यावर झोंपला होता त्यावर रक्ताचे डाग आहेत.' हें वर्तमान कळल्यावर कृपाणसिंहानें आपला भाऊ मारल्याबद्दल फार वाईट वाटत असल्याचें सोंग केलें. तो सेनापतींकडे गेला व म्हणाला: "आता मला आपल्या सैन्यासह परत स्वदेशीं जावेंसें वाटतें. नाहीतर राज्यांत गोंधळ होईल." आपल्या सहकारी रजपूत सेनापतींचा निरोप व परवानगी घेऊन तो रजपूत देशांत परत आला.

रणसिंहाच्या मृत्यूची गोष्ट ऐकून प्रजा फार दुःखी झाली. "भावाच्या आज्ञेप्रमाणे





मला राज्यकारभार हातीं घ्यावा लागत आहे" असें सांगून त्यानें भावाची सर्व उत्तरक्रिया केली आणि राज्यारोहणाची तयारी करूं लागला.

तो परत आला त्या दिवसापासून पुजेसाठीं म्हणून तो दररोज धुरूवावर चढून जाई आणि शंख वाजविण्याचा यत्न करी. परंतु शंखांतून फक्त वाराच बाहेर येई. आवाज मुळींच येत नसे. म्हणून त्या शंखाविषयीं त्यानें कोणत्याहि प्रकारें कोणाजवळ उल्लेख केला नाहीं. उलट कोणी तो विषय काढला तर तो, विषय

बदलून दुसऱ्याच [illegible] राज्याभिषेकापूर्वी [illegible] वारसानें तो शंख वाजविला [illegible] राज्याच्या मुख्य पुरोहितानें [illegible] कृपाणसिंहानें "हे जुने [illegible] काय बसला आहात, गु[illegible] सांगून उडवाउडवी केली.

राज्याभिषेकाचा दिवस [illegible] रोहण समारंभ थाटानें पार पडल[illegible] राजाची स्वारी हत्तीवर [illegible] [illegible] आनंदाला पारावार नव्हता.

इतक्यांत शंखध्वनी [illegible] कानाला [illegible] कृपाणसिंहाचें [illegible] झालें. त्याला काय करावें हे सुचेना.

"[illegible] म्हणाला. कोणाला त्यात संशय [illegible] नव्हता. सर्व राज्यारोहण समारंभ [illegible] [illegible]

[illegible] मी लवकरच शुद्धीवर [illegible] लोकांनी मला बाहेर काढलें [illegible] विश्वासघातक खुनी सैनिकाला धरलें आहे. [illegible] त्या तिघांचा वध करून मी त्याला योग्य प्रायश्चित्त दिलें आहे."

महाराज, हा एवढा अन्याय व [illegible]

आपल्याला वाटते? कोणी पैसे चारल्याशिवाय त्या गरीब बिचाऱ्यांना हें धाडस करण्याचें सुचलें नसतें.

रणसिंहानें एकदां सर्वांवर नजर फिरवून पाहिलें. कृपाणसिंह दिसला नाहीं तेव्हां म्हणाला "कोणी का असेना, हें पापकर्म भुतासारखें सतत त्याचा पाठलाग करील राहील. त्याला आयुष्यभर स्वस्थचित्तता लाभणार नाहीं. म्हणून त्याला निराळा दंड देण्याची गरजच नाहीं."

सर्व मेजवानीच्या मंडपात गेले. तेथें कृपाणसिंह नव्हता. भाऊ जिवंत असल्याचें कळतांच तो पळून गेला होता.

दुसऱ्या दिवशीं रणसिंहाच्या सत्कारार्थ पुन्हां सभा भरली. तोंपर्यंत कृपाणसिंहानेंच भ्रातृद्रोह केला असल्याचें सर्वांना कळ[illegible]





उंदराची मदत

शंकराचार्य अद्वैत सिद्धांताचा प्रसार करीत फिरत असतां चिदानंद नावाच्या एका ब्रह्मचारी संन्याशानें आपल्या शिष्यांसह येऊन शंकराचार्यांजवळ अद्वैताचा अभ्यास करण्याचें ठरविलें. परंतु चिदानंद स्वामींना किंवा त्यांच्या शिष्यांना संस्कृत भाषेचा गंध पण नव्हता. म्हणून एका गांवी आल्या त्यांनी एका विद्वान पंडिताकडे संस्कृत भाषेचा अभ्यास करण्यास मदत करावी अशी विनंती केली. ती ऐकल्यावर संस्कृत शिकवायला तो पंडित तयार असावा असें दिसलें. परंतु त्याच्या बोलण्या वागण्यावरून त्याच्या मनांत कोणती तरी शंका असावी असें दिसलें.

तें ओळखून चिदानंद स्वामी म्हणाले--"गुरुवर्य! मला व माझ्या शिष्यवर्गाला संस्कृत शिकविण्यास कांहीं हरकत असेल तर आपण काय तें खुशाल सांगावें."

"हरकत आमची कसली नाहीं. आमच्या या प्रांतांत दुष्काळ पडला आहे. तुम्हांला संस्कृत भाषेचा अभ्यास निदान एक वर्षभर तरी करावा लागेल. इतके दिवस आमच्या गांवचे लोक तुम्हांला पोट भरण्याइतकी पुरेल एवढी भिक्षा घालतील की नाहीं, एवढी एकच एक शंका माझ्या मनांत आहे."

"त्यांत काय! परमेश्वराची इच्छा असेल तसेंच होईल!" चिदानंद स्वामी म्हणाले.

गांवाच्या एका टोंकाला एक लहानसा मठ होता. चिदानंदस्वामी आपल्या शिष्य-वर्गासह त्या मठांत राहूं लागले. तो संस्कृत पंडित दर रोज येऊन त्यांना संस्कृत शिकवी. शिष्यवर्ग गांवांतून भिक्षा मागून आणी व सर्व ती वांटून घेत. चिदानंदस्वामी पंडिता-जवळ जें शिके तें आपल्या शिष्यवर्गाला शिकवी. अशा तऱ्हेनें विद्याभ्यास जोरानें चालू होता.

अशा तऱ्हेनें एक आठवडा गेला. एकदा चिदानंदस्वामी आपल्या शिष्यांना संस्कृत शिकवीत असतां एक लहानसा उंदीर तेथें आला आणि स्वामींच्या समोर भाताचा (साळींचा) एक दाणा ठेवून निघून गेला. कांहीं वेळानें तो पुन्हा आला आणि एक दाणा ठेवून निघून गेला. दोन तीन घटकांत तो कितीएकदां आला आणि स्वामींसमोर एकेक दाणा ठेवीत गेला.

"हें विचित्र दिसतें आहे. याच्या पाठीमागें खात्रीनें त्या परमेश्वराची प्रेरणा असणार" असें समजून चिदानंद स्वामींनी दिवा घेतला आणि तो उंदीर कोठें जातो हे पाहण्यासाठी मठाबाहेर गेले. तो उंदीर दाणा घेऊन आला तेव्हां मठाच्या आंत येणाऱ्या एका भोंकांतून बाहेर निघून दूर जमिनीवर कोठेंतरी पळत निघाला. नंतर एका बिळांत शिरला व अदृश्य झाला.



श्री. विजय ठमार

नंतर बराच वेळ वाट पाहिली तरी तो दिसला नाहीं. तें बीळ एका मठकाळ [illegible]

दुसऱ्या दिवशीं उजाडतांच चिदानंद स्वामी पंडिताकडे आले तेव्हां त्यांनीं रात्रीं जी गंमत पाहिली होती ती वर्णन करून सांगितली.

"निर्जन प्रदेशांतून उंदीर धान्य घेऊन येत आहे तर ताबडतोब शोध लावलाच पाहिजे कीं हें धान्य कोठून येतें. गांवच्या पाटलाच्या मदतीनें त्या बिळाजवळची जमीन खणली पाहिजे."

पंडित पाटलाकडे गेला. स्वामी चिदानंद यांच्याकडून त्याला जें काहीं कळलें होतें तें त्यानें पाटलाला सांगितलें आणि म्हणाला "आठ दहा जणांना लावा, ती [illegible] खणायला [illegible]"

काहीं कुदळी व फावडीं आणि मजूर [illegible] बरोबर घेऊन मठाजवळ गेला आणि [illegible] स्वामीनें मठामागची बीळ असलेली [illegible] दाखविली.

एक तासभर खणल्यानंतर त्यांना [illegible] खालीं दडलेलें एक जुनाट कोठार [illegible] त्यांत धान्याचे ढीग होते व त्यावर बसून उंदरांची मेजवानी चालली होती.

गांवच्या पाटलानें सर्व धान्य [illegible] गांवांत नेलें. गांवकऱ्यांना त्यांतलें [illegible] तेवढें धान्य वांटलें व जें उरलें तें [illegible] भरून ठेवून दिलें. अशा तऱ्हेनें उंदरांच्या मदतीनें गांवावरचें दुष्काळाचें संकट [illegible]

दुसऱ्या वर्षी चांगला पाऊस पडला, म्हणून [illegible] नाहीं [illegible]. उंदरांनीं केलेली ही मदत गांवावरचें एक मोठें संकट टाळण्यास उपयोगी ठरली.



कृष्णावतार

कालिंदी नदीच्या काठीं एक गांव होतें. त्या गांवीं गाई, वासरें व बैल पुष्कळ. गांवच्या बायका दूध दुभत्याचें काम करण्यांत प्रसिद्ध होत्या. गांवांत सदा आनंदीआनंद असे. वसुदेवाच्या सूचनेवरून नंद त्या गांवीं सकुटुंब निघाला. गांवच्या प्रमुखांनीं त्याचें स्वागत केलें. नंदानें त्यांची कुशलवार्ता विचारली. सर्वांचा परिचय झाला व नंद त्यांच्या गांवीं जाऊन राहूं लागला. वृद्ध गोपींनीं नंदाच्या घरीं येऊन यशोदेचें व तिच्या मुलाचें अभिनंदन केलें. मुलाचें बारसें थाटानें झालें. त्याच्या सावळ्या रंगावरून त्याचें नांव कृष्ण ठेवण्यांत आलें. रोहिणी पण आली. नंदानें तिचा सर्व प्रकारें सत्कार केला. कृष्ण गोपींचा लाडका बाळ झाला. त्याला आपलें व परक्याचें घर असा फरक मुळींच कधी कळला नाहीं.

कंसाला वसुदेवाचा मुलगा जिवंत असल्याचें योगमायेच्या तोंडीं कळलेंच होतें. म्हणून त्यानें कित्येक राक्षसांना शिशुहत्येच्या कामावर नेमलें होतें. त्यांत पूतना नांवाची एक भयंकर राक्षसीण होती. तिची आकृति भयंकर होती. ती रात्रीं गांवांत शिरली. तिची नजर मुलांवरच होती. बालकृष्णाला पाहून ती थांबली.



मुलगा सुंदर व तेजस्वी दिसला. इतर मुलांहून अगदी निराळा. तिला वाटलें की हाच असावा कंसवध करण्यासाठी जन्मलेला मुलगा.

हा विचार मनांत येतांच तिचा पारा चढला. दांत ओठ चावून ती त्या मुलाकडे पाहूं लागली. तिच्या डोळ्यांतून जणुंकाही ठिणग्या उडूं लागल्या. कपाळाला आठ्या पडल्या. नागसापाच्या फुत्कारासारखा श्वासोच्छ्वास जोरजोरानें सुरू झाला. तिनें आईच्या कुशींत झोपलेल्या मुलाला उचलून मांडीवर घेतलं आणि आपले विषारी स्तन त्याच्या तोंडांत कोंबले. कृष्ण जोरानें रडला. पण तें रडण्याचें सोंगच होतें. कारण त्यानें पूतनेचे दोन्ही स्तन घट्ट धरून तिचें दूध नव्हे तर तिचें रक्त शोषण करून तिला नको जीव करून सोडलें होतें. इतकें की शेवटीं ती मोठ्यानें ओरडली व धाडदिशीं जमिनीवर मरून पडली.

तिचा तो भयंकर आवाज ऐकून गोकुळच्या गवळणी जाग्या झाल्या आणि नंदाच्या घरीं धांवून आल्या. कृष्ण रडला त्याच वेळीं यशोदा जागी झाली होती. कुशींत मुलगा नाहीं हें पाहून तिनें नंदाला जागें केलें. नंद आला व शेजारचे गवळी पण धांवले. तेव्हां त्यांना पूतनेचें तें भयंकर रूप दिसलें. ती अक्राळ जमिनीवर मरून पडली होती आणि तिची छाती धरून माकडाच्या पिलासारखा कृष्ण खेळत होता. यशोदा व नंद दोघांनीं आपल्या लहानग्याचा तो पराक्रम पाहिला व म्हणाले. "शाबास बाळा!" आणि मुलाला उचलून घेतलें.

"ही राक्षसीण इकडे कोठून कधीं काय आली? हिनें मुलाला उचललें तें तुला नाहीं का कळलें?" नंदानें यशोदेला विचारलें.

"मुलाला दूध पाजून मी झोपविलें होतें. बराच वेळ मी जागी होतें. केव्हां डोळा लागला कोणास ठाऊक! तसा जास्त वेळ सुद्धां झाला नाहीं. ही राक्षसीण कोठून आली, कधीं आली तें त्या देवालाच माहीत! मुलाला उचलून घेण्यांत तिचा काय हेतू होता नकळे. परंतु त्या राक्षसिणीच्या हातीं त्याच्या केसालादेखील धक्का लागला नाहीं. देवाची दया!" यशोदा म्हणाली.

कृष्ण तेवढ्या मोठ्या संकटांतून वांचला. प्रत्येक गवळ्याच्या मनांत तोच विचार होता. त्यांना फार आनंद झाला. त्यांनीं पूतनेचा देह एका बाजूला ओढून नेला. नंदानें आपल्या लाडक्याला उचलून घेतलं. यशोदेनें आपल्या बाळाची दृष्ट काढली.

एकदां वसुदेवानें गर्ग नांवाच्या आपल्या गुरूजींना कंसाच्या नकळत गोकुळीं पाठविलें. त्यानें रोहिणीच्या मुलाचें नांव बलराम व यशोदेच्या मुलाचें नांव कृष्ण ठेवलें.

नंदाच्या आनंदाला पारावार नव्हता. त्यानें ब्राह्मणांना बोलावून दक्षिणा व




गोदान केलें. गोपूजा केली. गायगोपींनीं नंद यशोदेचें अभिनंदन केलें.

तिकडे मथुरेला, इकडे पूतनेची जी दुर्गती झाली त्याची बातमी कंसाला कळली. त्याच्या राक्षस दूतांनीं सब वर्तमान त्याला कळविलें. कंसाला नंदाच्या मुलाचें भय जास्तच वाटूं लागलें. त्यानें नंदाच्या मुलाचा शेवट जो करील त्याला मोठें बक्षिस मिळेल असें जाहीर पण केलें. तें ऐकून शकटासुर नांवाचा एक राक्षस अदृश्यपणें गोकुळीं गेला व नंदाच्या गाडींत शिरून संधी पहात बसला.

यशोदेनें कृष्णाला गाडीच्या सावलीत एक घोंगडी टाकून निजविलें व स्वतः नदीवर स्नानाला गेली. ती गेल्यावर कांहीं वेळानें कृष्ण जागा झाला व जवळ आई नाहीं हें कळल्यावर तोंडांत बोटें घालून मोठ्यानें रडूं लागला आणि लाथा झाडूं लागला. गाडीच्या चाकाला एक लाथ लागली तेव्हां ती एका बाजूला वाकून पडली आणि मोडून गेली. शकटासुर ठार झाला.

इतक्यांत यशोदा नदीवरून परत आली व गाडी मोडून पडलेली पाहून धांवत गाडीकडे गेली. गाडी उलटून पडलेली होती. ती "अगोबाई!" म्हणून मोठ्यानें ओरडली आणि मुलाला उचलून पोटाशीं धरलें. "मुलगा झोंपला आहे असें समजून मी या गाडीवर झोंपवून गेलें होतें. आतां मुलाचे वडील येऊन रागावतील. पण ही गाडी अशी उलटली कशी? कोणी विचारलें तर मी काय उत्तर देऊं? सर्व मंडळी नाहीं नाहीं तें बोलतील." असे अनेक विचार तिच्या मनांत येत होते. मुलाला मांडीवर घेऊन तिनें त्याला दूध पाजलें.

इतक्यांत नंद आपल्या मित्र गवळ्यांबरोबर बोलत घरीं आला. त्याचे केस विस्कटलेले होते. सर्व अंग धुळीनें माखलेलें होतें. हातांत एक दांडकें होतें. येतांच उलटलेली गाडी व मोडलेलें चाक पाहून त्याचें सर्व अंग थरारलें. कारण त्याच्या मुलाला नेहमीं गाडीखालींच झोंपवीत. गाडी उलटलेली व चाक मोडलेलें. मुलाला तर कांहीं इजा झाली नाहीं? त्याच्या छातींत धस्स झालें.





त्याच वेळीं त्यानें यशोदा कृष्णाला दूध पाजीत आहे हें पाहिलें. तेव्हां कोठें त्याला जिवांत जीव आल्या सारखें वाटलें. कृष्ण त्याच्याकडे पाहून हसत होता. त्यानें मुलाला उचलून घेतलें आणि यशोदेला विचारलें—"गाडी अशी उलटली कशी?" पण ती तरी काय उत्तर देणार? तिला देखील तेंच आश्चर्य वाटत होतें. मस्त बैलानें येऊन शिंगानें गाडी उलटली असेल कदाचित असा ही एक विचार त्याच्या मनांत आला. "कांहीं असो, देवानें माझ्या मुलाला वांचविलें!" असा विचार करून त्यानें देवाला नमस्कार केला. यशोदा पुढें होऊन म्हणाली—'मुळांत चूक माझी! मुलाला असें उघड्यावर झोंपवून मी नदीवर गेलें होतें. नदीवरून येऊन पाहतें गाडी उलटलेली दिसली. माझें नशीब बलवत्तर! त्याच्या कृपेनेंच माझा मुलगा वांचला."

इतक्यांत कांहीं मुलें तिकडे खेळत आलीं म्हणालीं—"अहो! आम्ही डोळ्यांनीं पाहिलें, तुमचा मुलगा लाथा झाडझाडून रडत होता. एक लाथ लागल्याबरोबर गाडी उलटली!"

तें ऐकून नंद व यशोदेला वास्तव आश्चर्य वाटलें. त्यांनीं आपल्या पराक्रमी मुलाची पुन्हां पुन्हां दृष्ट काढली आणि देवाचे आभार मानले.



हां हां म्हणतां ती बातमी गांवभर पसरली. सर्व गांव नंदाच्या घरीं जमा झालें. सर्व चकित झाले. त्यांनीं गाडी सरळ उभी केली. चाक दुरुस्त करून बसविलें आणि घरीं गेले. अशा तऱ्हेनें शकटासुराचा वध झाला.

हळूहळू कृष्ण रांगूं लागला. खाटेला धरून उभा राहूं लागला व चालू पण लागला. कोणी गुदगुल्या केल्या कीं मोठ्यानें हंसू लागला. कधीं नंदाचें तर कधीं यशोदेचें बोट धरून चालूं लागला. इतका खेळकर होता कीं नंदाकडे येणारे गोपगोपी त्याला जवळ बोलावीत. तो उभा राहून चालायचा प्रयत्न करी व पडला कीं लोक जवळ जाऊन त्याला उचलून घेत. पुढें कांहीं दिवसांनीं तो रस्त्यावर धांवत जाऊं लागला. मातीत बसून खेळूं लागला.

यशोदा मुलाला लोणी खायला देई. तो लोणी खाई आणि तोंड, हात, पाय, सर्व अंग लोण्यानें माखून घेई.

कृष्ण हळूहळू शेजारच्या गवळणींकडे जाऊं लागला. गवळणी त्याला जवळ बोलावून लोणी खायला देत. पुढें पुढें तो त्यांची रवी धरून उभा राही. त्यांचा पदर ओढी व हट्ट करी कीं पहिल्यानें लोणी खायला द्या. त्यांनीं लोणी खायला दिलें कीं तो आणखी मागे. गोपी लोणी खायला देत. पण म्हणत—"एक पाय नाचिव रे गोविंदा, घागरीच्या छंदा!" आणि कृष्ण खरोखरच नाचूं लागे. त्या आनंदांत गोपी देहभान विसरून जात. लोणी काढायचें बंद करून कृष्णाकडे पहात उभ्या रहात. कृष्ण स्वतःच्या हातानें लोणी उचलून खाई व तें पाहून त्यांना जो आनंद होई तो काय वर्णावा!

पण कृष्ण गोपबालकांना घेऊन गोपींच्या घरांत शिरूं लागला. लोणी




चोरून खाऊं लागला. तो माडीं उलटून टाकी, साय, दही व लोणी जें मिळे तें स्वतः खाई व आपल्या सवंगड्यांना खायला देई. गोपी कृष्णाला धरायला धांवत. "पकडा, पकडा!" म्हणून त्याचा पाठलाग करीत व त्याला धरून यशोदेकडे घेऊन जात व तो किती दंगा करतो याच्या तक्रारी सांगत.

कृष्ण व त्याचे बालसवंगडी गांवभर फिरत आणि शिंक्यावर ठेवलेलें लोणी, साय, दूध, दही ताक जें मिळे तें खात व भांडीं फोडून पळून जात. मुलांचा धुडगुस इतका सुरू झाला की कृष्णाच्या खट्याळ-पणाच्या तक्रारी मंद यशोदेच्या कानावर येऊं लागल्या.

कृष्णाचा व त्याच्या सवंगडी मित्रांचा दंगा पळण्यावरच थांबला असता तरी मागलें असतें. मुलें गोठ्यांत शिरत व वासरांना सोडून देत. वासरें गाईचें दूध पिऊन टाकीत व बाहेर पळून नाचत बागडत. मुलें ती गंमत पाहून हंसत.

कृष्ण आपल्या मित्रांना शिकवून देई व सर्व मिळून लोणी कसें चोरायचें याच्या युक्त्या योजीत. ताकाच्या मांड्यांत दूध ओतून ठेवीत. दूध चुलीत नेऊन ओतीत. लोण्याच्या मांड्यांत दही किंवा दह्याच्या मांड्यांत लोणी नेऊन टाकीत. मुलें ओणवी उभी रहात व कृष्ण त्यांच्या पाठीवर चढून शिंक्यावरचें दही व लोणी खाई व सर्वांना खायला देई.

अशातऱ्हेनें कृष्णानें व त्याच्या मित्र-मंडळीनें सर्व गोकुळांत असा धुमाकूळ माजविला की त्यांना कसें ताळ्यावर आणावें हें कोणाला सुचेना.





अरण्यपुराण

[६]

मोवलीनें मनुष्यांची भाषा शिकून घेण्याचें ठरविलें. जंगलांत रहात असतां त्याला प्रत्येक जातीच्या जनावराची भाषा येत होती. मेस्सुआच्या तोंडांतून जो शब्द किंवा वाक्य निघे त्याची आवृत्ति मोवली करी. सूर्यास्त पडण्यापूर्वी झोपडींतल्या सर्व वस्तूंची नांवें मोवलीला तोंडपाठ झाली.

रात्रीं झोपतांना एक मोठा प्रश्न उत्पन्न झाला. पिंजऱ्यासारख्या त्या झोपडींत त्याला झोप येईना. दरवाजा बंद करतांच मोवली खिडकींतून बाहेर निघून गेला.

"त्याला जिकडे जायचें असेल जाऊं दे. कारण कधीं तो अंथरुणावर झोपला नाहीं. तो आपला मुलगा म्हणून आला आहे तर तो आपल्याला सोडून कधीं जाणार नाहीं." मेस्सुआचा नवरा तिला म्हणाला.

मोवली शेतांत जाऊन हिरव्या गार गवतावर जाऊन झोपला.

त्याला पडलेल्या गोष्टी आठवूं लागल्या. काळ्या वाघानें त्याला 'लालफूल' आणायला सांगितलें होतें तेव्हां तो थोडासा विस्तव एका घरांतून उचलून घेऊन रानांत गेला होता. एकु रात्रीं एक शिकार करतांना हारला होता आणि कळपानें त्याला जो दंड दिला होता तो भोगीत होता. कळपांतल्या लांडग्यांनी मोवलीचा दिवसभर कसा शोध केला हे काळ्या वाघानें मोवलीला येऊन सांगितलें होतें. मोवलीनें काळ्या गोळा करून रात्रभर जाळ राहील याची

शेवटीचें पहा



काळजी बाळगली होती. त्या दिवशीं रात्रींच कळपाची सभा भरली होती.

वाघानें भाषण केलें तेव्हां मौंवलीनें वाघाला कळपाचा नायक कोण असावा या विषयीं बोलण्याचा अधिकार नाहीं असा आक्षेप केला होता. परंतु कळपानें त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केलें होतें. वाघा म्हणाला होता कीं त्या मनुष्याच्या पिल्लावर त्याचा अधिकार होता. कळपाला निक्षून मौंवलीला ठार करण्याचा बेत झाला होता. मौंवलीनें उठून कळपाच्या मधोमध जळकें लाकूड फेंकलें होतें. विस्तव पाहून कळपाचे कोक

घाबरले. वाघाचें अंग पोळलें. लाडगिणींचा निरोप घेऊन तो पसार झाला वगैरे वगैरे.

त्याचा डोळा लागला असेल नसेल त्याच्या हनुवटीला कोणाचें तरी नाक लागलें. तो त्याचा मोठा भाऊ म्हणजे लांडगिणीचा मोठा मुलगा होता.

"हें रे काय! वीस मैल तुझा शोध काढीत आलों आहें. हेंच का याबद्दल बक्षिस? तुझ्या अंगाला धुराचा वास येत आहे. जनावराच्या अंगाच्या वासासारखा वास येत आहे आणि एवढ्यांत तूं मनुष्य झालास का? ऊठ! मी एक बातमी घेऊन आलों आहें." मोठा भाऊ म्हणाला.

मौंवलीनें त्याला जवळ पोटाशीं ओढून विचारलें—"रानांत सर्व सकुशल आहेत ना?"

"लालफुलामुळें ज्यांचें अंग पोळलें गेलें आहे त्यांच्या शिवाय बाकी सर्व खुशाल! वाघाचें अंग पोळलें गेलें होतें ना! अंगावरचे केस पुन्हां उगेपर्यंत स्वारी दूर कोठें तरी निघून गेली आहे. पण परत आल्यावर तुला ठार करण्याची प्रतिज्ञा करून गेला आहे." मोठा भाऊ म्हणाला.

"मीदेखील तशीच एक प्रतिज्ञा केली आहे. मधून मधून येऊन रानातल्या बातम्या देत रहा. मला आतां झोप येत आहे." मौंवली म्हणाला.

"मनुष्यांच्या भुलावण्यांत येऊन तू लांडगा आहेस हें विसरूं नकोस."

"तें कसें विसरेन! तुला आणि आपल्या गुहेंतल्या लांडग्यांना कधीं विसरेन का? त्याच बरोबर मला कळपांतून हाकलून दिलें होतें हेंदेखील विसरणार नाहीं."

"परंतु या नव्या कळपांतून तुला कोणी काढून टाकणार नाहीं, ही गोष्टदेखील लक्षांत असूं दे. किती झाला तरी मनुष्य तो मनुष्यच! ते बोलूं लागले कीं वाटतें, डबक्यांतले बेडूक ओरडत आहेत. मी येईन तेव्हां कुंपणापलीकडे तुझी वाट पाहीन." असें सांगून तो परत रानांत निघून गेला.

मौंवली तीन महिने गांवाबाहेर कोठें गेला नाही. तो मनुष्यांच्या चालीरीती, भाषा व वागणें शिकत राहिला. पहिल्यानें एक कापड पांघरून त्याला ठेवीत. तें त्याला मुळींच आवडत नसे. नंतर त्याला रुपये पैसे व त्यांचा उपयोग शिकवण्यात आला. पण त्याला तें कळेना. नंतर त्याला शेत नांगरण्याचें शिक्षण द्यावें लागलें. पण त्यापासून फायदा काय हें कळेना.



गांवांतलीं मुलें त्याला फार त्रास देत. रानांत राहिल्यानें राग आवरण्याची शक्ति त्याच्या अंगांत भरपूर आली होती. रानांत स्वतःचा जीव वांचविण्यासाठीं कधीं कधीं राग आवरावा लागे. परंतु मुलें त्याच्या बोबडेपणाची किंवा त्याला खेळतां येत नाहीं याची थट्टा करूं लागले कीं त्याला चीड येई व त्यांना चिरून फाडून टाकावेंसें त्याला वाटे. परंतु लहानमुलांच्या थट्टेला मारणें बरोबर नाहीं असा विचार करून तो स्वतःला आवरी. स्वतःच्या अंगांत किती बळ आहे हें मौंवलीला

माहीत नव्हतें. आपल्याहून शक्तिशाली प्राणी कितीतरी आहेत हें त्याला चांगलें माहीत होतें. पण गांवकऱ्यांना वाटे की त्याच्या अंगात बैलाची शक्ति असली पाहिजे.

मनुष्य जातींत जो जातिभेद आहे त्याची मौगलीला कल्पनादेखील नव्हती. कुंभाराचें गाढव एकदां चिखलांत पडलें तेव्हां त्यानें त्याचें शेपूट धरून त्याला उभें केलें आणि त्याच्या पाठीवर मडकीं रचून ठेवण्यास कुंभाराला मदत केली. ती त्याची चूक ठरली. कारण कुंभार खालच्या जातीचा होता. गाढवाला त्यानें हात लावला ही तर त्याहून मोठी चूक. पुरोहित त्याला खूप रागावले.

"उद्यां तुम्हांला सुद्धां मडक्याबरोबर गाढवावर बसवून पाठवीन." मौगली पुरोहिताला म्हणाला.

पुरोहितानें मेस्सुआच्या नवऱ्याला हें जाऊन सांगितलें. म्हणाला—"या मुलाला कांहीं तरी काम दे. नाहीतर हा बिघडणार!"

गांवाच्या पाटलानें मौगलीला बोलावून, रानांत म्हशी चरायला घेऊन जायला सांगितलें. याहून जास्त आनंदाची गोष्ट काय असणार त्याला! गांवच्या सर्व म्हशी तोच चरायला घेऊन जाई. तो गांवाकरितां काम करणारा गांवभरचा नोकर झाला. म्हणून रोज सायंकाळीं गांवकऱ्यांची सभा होई, त्या सभेला तो हजर राहूं लागला. झाडावर माकडें बोलत. झाडाच्या पारावाळीं नागसाप रहात असे. त्याला दैवत म्हणून लोक दूध पाजीत. वृद्ध वडील माणसें तेथें जमा होत व हुक्का पीत बराच वेळ बोलत बसत. देव, मनुष्य, भूतपिशाच वगैरे त्यांच्या बोलण्याचे विषय असत. (चालू)



६०. अति प्राचीन गुहेंतील चित्रकारी

फ्रांस देशाच्या मध्यवर्ती प्रदेशांतल्या गुहांत २० हजार वर्षांपूर्वी प्रस्तर युगीन मनुष्यप्राण्यांनी अद्भुत चित्ररचना करून ठेवली आहे. त्यांनी बोटें रंगांत बुडवून व हाडांच्या पोकळींत रंग फुंकून ही चित्रें काढली. यांत शिकारी, भाला खुपसलेल्या जनावरांना पकडून नेत असलेले दिसतील.

